# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. १५०-२३** **दिनांक :- ११/०५/२०२३**

## चोरीच्या गुन्हयातील सराईत आरोपीतास अटक करुन ०२ गुन्हे उघडकीस पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १५/०४/२०२३ रोजी १४.०० वा. ते दि.१६/०४/२०२३ रोजी सकाळी ०९.०० वा.चे दरम्यान रिचर्ड कंम्पाऊंड, मनिचापाडा, नालासोपारा(पु.), ता. वसई, जि. पालघर येथील फिर्यादी यांचे रुद्र कॉर्पोरेशन फेब्रिकेशन वर्क कंपनी बाहेर ठेवलेली एक २० हजार रुपये किंमतीची फायब्रिकेशनची लोखंडी कंपोजिट बिम, कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरी करुन नेलेबाबत फिर्यादी श्री. संतोष शशिकांत पाटील,रा. साईदिप प्लाझा, नालासोपारा (पु.) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात आरोपीताविरुध्द पेल्हार पोलीस ठाणेत गुन्हा. रजि. नं. I ३६७/२०२३, भा.दं.वि.सं. कलम ३७९ अन्वये दिनांक १७/०४/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वर नमुद गुन्हयाचे अनुषंगाने पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुप्त बातमीदार व गुन्हयाचे घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजचे अवलोकन करुन प्राप्त माहितीच्या आधारे सराईत आरोपीत नामे निखील भोईर, वय-२० वर्षे, रा. चिंचोटी, ता. वसई, जि. पालघर यांस ताब्यात घेवुन तपास केला असता त्याने वर नमुद गुन्हा करण्यासाठी वापरलेली रिक्षा हि नायगाव पुर्व येथुन चोरी करुन गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले आहे. नमुद आरोपीतास दिनांक ०९/०५/२०२३ रोजी अटक करुन त्याचेकडून एक लोखंडी कंपोजिट बिम व एक ऑटो रिक्षा असा **मुद्देमाल हस्तगत** करण्यात आला आहे. नमुद आरोपीत यांचेकडून खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आले आहेत.

### -:उघडकीस आलेले गुन्हे:-

| अ.क्रं. | पोलीस ठाणे | गु.रजि.नं. व कायदा कलम |
|---|---|---|
| १ | पेल्हार | गु.रजि.नं. I ३६७/२०२३,भा.दं.वि.सं.कलम-३७९ प्रमाणे **(मुळ गुन्हा)** |
| २ | नायगाव | गु.रजि.नं. I ५१/२०२३, भा.दं.वि.सं. कलम- ३७९ प्रमाणे, |

नमुद अटक आरोपीत याचेवर यापुर्वी वालीव पोलीस ठाणे व पेल्हार पोलीस ठाणे येथे वाहन चोरी व इतर चोरीचे गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली पेल्हार पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. वसंत लब्दे, व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पो.उप.नि. सनिल पाटील, पो.हवा. योगेश देशमुख, तुकाराम माने, तानाजी चव्हाण, प्रताप पाचुंदे, पो.अंम संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड, रोशन पुरकर, निखिल मंडलिक यांनी केली आहे.

-----oooo-----